महाराष्ट्र शासन
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे-४११०३०

---

**प्रसिद्धी निवेदन-**

वय वर्षे ०३ ते ०८ वयोगटासाठी (पायाभूत स्तर) पुनर्रचित पायाभूत स्तर अभ्यासक्रम व पाठ्यक्रम -२०२३ मसुदा तज्ज्ञांचे मदतीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे मार्फत तयार करण्यात आला असून सदर मसुदा परिषदेच्या https://www.maa.ac.in/ या संकेतस्थळावर **दिनांक.१७/०२/२०२४ पासून** जनतेच्या प्रतिक्रियांसाठी खुला करण्यात आला आहे.

पायाभूत स्तर अभ्यासक्रम व पाठ्यक्रम मसुद्याबाबत सर्व समाज घटक, शिक्षक, पालक, शिक्षण तज्ञ, शैक्षणिक प्रशासन यांनी आपले अभिप्राय **दिनांक.२७/०२/२०२४ पर्यंत** खालील लिंक वर नोंदवावेत अथवा पोस्टाने पाठवावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

**अभिप्राय नोंदवत असतांना त्यामध्ये आपले नाव, मोबाइल नं. इमेल, पत्ता, कार्यालय, जिल्हा इत्यादी तपशील देण्यात यावा. तसेच अभिप्राय व सूचना सप्रमाण व सकारण नोंदविल्या जाव्यात त्यामध्ये क्षेत्र, विषय, स्तर, पृष्ठ क्रमांक, मूळ मसूद्यातील तपशील, आवश्यक बदल, बदलाचे कारण, कोणत्या रकाण्यात दुरुस्ती आवश्यक वाटते याचा तपशील असावा.**

टीप : पोस्टाने अभिप्राय पाठवणार असल्यास त्यावर पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम- २०२३ बाबत अभिप्राय (अभ्यासक्रम विकसन विभागासाठी) असे ठळक अक्षरात लिहून, वरील पत्त्यावर पाठवावेत.

- **अभिप्राय नोंदवण्यासाठी LINK** https://forms.gle/R2U5gUpE8jCRDz816
- **अभिप्राय नोंदवण्याचा कालावधी दि. १७/०२/२०२४ ते २७/०२/२०२४**

SCAN ME

**(राहूल रेखावार,**भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.